पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती समिती,

कार्यपत्रिका क्र.५

सभावृत्तांत

दिनांक ०१/०८/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे ऑगस्ट २०१४ ची मासिक सभा शुक्रवार दि. ०१/०८/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. मा. श्रीमती आरती चोंधे | अध्यक्ष, |
| २. मा. श्री. कैलासभाऊ गबाजी थोपटे | सदस्य |
| ३. मा.श्री. रामदास गेणभाऊ बोकड | सदस्य |
| ४. मा.श्रीम. विमल रमेश काळे | सदस्य |
| ५. मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे | सदस्य |
| ६. मा. श्री. गौतम सुखदेव चाबुकस्वार | सदस्य |
| ७. मा.श्रीम. सुनिता राजेश वाघेरे | सदस्य |
| ८. मा. श्रीम. उषा संजोग वाघेरे (पाटील) | सदस्य |
| ९.मा. श्री. प्रमोद रघुनाथ ताम्हणकर | सदस्य |
| १०. मा. श्रीमती निता विलास पाडाळे | सदस्य |
| ११.मा. श्रीमती अनिता मच्छिंद्र तापकीर | सदस्य |
| १२. मा. श्री. विलास एकनाथ नांदगुडे | सदस्य |
| १३.मा. श्रीमती. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| १४. मा. श्री. राजेंद्र गणपत जगताप | सदस्य |
| १५.मा. श्री. विनोद जयवंत नढे | सदस्य |

याशिवाय मा. दत्तात्रय एम. फुंदे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, तथा सचिव,सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. रामदास तांबे, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, मा. सोनवणे, उपअभियंता स्थापत्य,मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.आर.एम.भोसले, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. पाडवी, कनिष्ठ अभियंता विद्युत इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

श्री. रामदास बोकड :- पुणे जिल्हयातील आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर तीर्थक्षेत्राजवळच्या माळीण या गावात दिनांक २९/७/२०१४ रोजी घडलेल्या दुर्दैवी घटनेमध्ये अंदाजे २०० नागरीकांचा मृत्यु झाला असुन त्यांचे व त्यांचे कुटुंबियांवर जी आपत्ती ओढवली आहे त्याबाबत सभागृहामध्ये ड प्रभाग समितीच्या सर्व सभासदासंह श्रध्दांजली वाहणेकामी सूचना मांडतो.

त्यानंतर सर्व सदस्य व अधिकारी यांनी श्रध्दांजली वाहिली व सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

श्री. विलास नांदगुडे:- सर्व सदस्य व मा. सभापती यांचे लक्ष वेधतो की प्रभाग समितीची बैठक वेळेत सुरु व्हावी व सर्व सदस्यांनी सभेस वेळेत उपस्थित रहावे.

सद्यस्थितीत पिंपरी चिंचवड परिसरात पाऊस झाल्याने स्टॉर्म वॉटर ड्रेनेजचे तसेच क्षेत्रीय कार्यालय परिसरातील विविध ठिकाणचे ड्रेनेजचे चेंबर्स तुंबले असुन सदर ड्रेनेजचे चेंबर्सची स्वच्छता आरोग्य विभागाकडून व्यवस्थित न झाल्याने तसेच सर्व ड क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील परिसरात सार्वजनिक स्वच्छतेच्या बाबत आरोग्य विभागाच्या कर्मचा-यांच्या उदासीनतेबाबत सर्व सदस्यांनी आरोग्य विभागाचे कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच स्थापत्य विभागाकडून करण्यात आलेल्या निविदा विषयक कार्यवाहीच्या अनुषंगाने नाराजी व्यक्त करण्यात आली.

या पुढील ड प्रभाग समितीचे सभेस बीआरटीएस प्रकल्प, नगररचना विभाग, पशुवैद्यकीय अधिकारी , स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, जलनि:सारण व बांधकाम परवानगी विभागाचे प्रमुख अधिकारी यांना उपस्थित राहणेकामी सूचना देणेत येऊन कार्यक्रमपत्रिकेवरील विषयांबाबत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मागील कार्यक्रमपत्रिका क्र. ४ दि. १४/७/२०१४ रोजीचे सभेचा सभावृत्तांत कायम करण्यास मान्यता दिल्याचे मा. अध्यक्षा यांनी सांगितले.

**विषय क्र.१** - प्रभाग क्र. ४८ रहाटणी फाटा चौकास सद्‌गुरु श्री वामनराव पै यांचे नाव देणे

**विषय क्र.२** - प्रभाग क्र. ४३ जिजामाता रुग्णालय येथे कमला नेहरु शाळेलगत नादुरुस्त मुतारी असुन ती पडलेल्या स्थितीत असल्याने ती पाडण्यात येऊन त्याच ठिकाणी जास्त सीटस असलेली मुतारी नव्याने बांधण्यात यावी.

तदनंतर मा. सदस्य यांचे मागणीप्रमाणे व मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने खाली नमूद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र. ३** - प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख विशालनगर येथील झुंजारराव तांबोळी यांच्या घरासमोरील चौकास स्वातंत्र्यसैनिक डी. एस. गिरमे पथ/चौक व ८३/२ व्हल्कन सोसायटी पिंपळे निलख येथील चौकास कै. बाबुराव कामठे चौक असे नाव देणेबाबत मा. आरती चोंधे यांचा प्रस्ताव

**विषय क्र. ४** - प्रभाग क्र. ४५ मधील पिंपरी वाघेरे या ठिकाणी तपोवन रोडमधील चौकास श्री संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली)चौक असे नामकरण करणे बाबत मा. उषा संजोग वाघेरे(पाटील) यांचा प्रस्ताव

**विषय क्र.५** - पारिजात कॉलनी सर्व्हे नं. ८४ व ८५ प्रभाग क्र. ५६ मधुन बीआरटीएस रोड तयार झालेला असुन त्या ठिकाणी नाशिक फाटा उड्डाणपुलापासुन वाकड कडे जाणा-या रस्त्याचा शेवटचा चौक स्वराज हॉटेलच्या अलिकडे आहे. त्या चौकास सुदर्शन चौक असे नामकरण करणेबाबत मा. रामदास गेणभाऊ बोकड यांचा प्रस्ताव

**विषय क्र. ६** - आरक्षित जागेवर मनपाचे व्यायामशाळा/दवाखाना इमारतीचे शेवटचे मजल्यावर जी पत्राशेड उभारण्यात आलेली आहे ती कोणत्याही कारणासाठी वापरात येत नसुन सदर पत्राशेड नवीन पाण्याच्या टाकीचे ठिकाणी पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील आवश्यक असणारी साधनसामग्री/ साहित्य ठेवणेसाठी आवश्यक असल्याने मनपाचे दवाखाना इमारतीवरील पत्राशेड तातडीने स्थलांतरीत करणेबाबत मा. राजेंद्र गणपत जगताप यांचा प्रस्ताव

------

| | |
|---|---|
| ठराव क्र. ५ | विषय क्र. १ |
| दिनांक ०१/०८/२०१४ | विभाग – स्थापत्य |
| सुचक – मा. कैलासभाऊ थोपटे | अनुमोदक – मा. शितल नाना काटे |

संदर्भ : मा. कैलासभाऊ थोपटे यांचा दि. २/७/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४८ रहाटणी श्रीनगर या भागामध्ये जीवन विद्या मिशनचे कार्य व सत्संग चालु असुन तेथील साधकांनी रहाटणी फाटा चौकास सद्‌गुरु श्री वामनराव पै यांचे नाव देणेबाबत विनंती केली असलेवरुन सदर चौकास सद्‌गुरु वामनराव पै यांचे नाव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------

ठराव क्र. ६ विषय क्र. २

दिनांक ०१/०८/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.गौतम चाबुकस्वार अनुमोदक – मा. सविता डी. आसवानी

संदर्भ : मा. गौतम चाबुकस्वार यांचा दि. १४/७/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४३ जिजामात रुग्णालय येथे कमला नेहरु शाळेलगत नादुरुस्त मुतारी असुन ती पडलेल्या स्थितीत असल्याने ती पाडण्यात येऊन त्याच ठिकाणी जास्त सीटस असलेली मुतारी नव्याने बांधण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

सभा कामकाजात ऐनवेळेस दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्र.७ विषय क्र. ३

दिनांक ०१/०८/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. आरती चोंधे अनुमोदक – मा. निता पाडाळे

संदर्भ : मा. आरती चोंधे यांचा दि. ३१/७/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ५४ पिंपळे निलख विशालनगर येथील झुंजारराव तांबोळी यांच्या घरासमोरील चौकास स्वातंत्र्यसैनिक डी. एस. गिरमे पथ/चौक व ८३/२ व्हल्कन सोसायटी पिंपळे निलख येथील चौकास कै. बाबुराव कामठे चौक असे नाव देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्र. ८ विषय क्र. ४

दिनांक ०१/०८/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. उषा संजोग वाघेरे(पाटील) अनुमोदक – मा. शितल विठ्ठल कुटे

संदर्भ : मा. उषा संजोग वाघेरे(पाटील) यांचा दि. ३१/७/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. ४५ मधील पिंपरी वाघेरे या ठिकाणी तपोवन रोडमधील चौकास श्री संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली)चौक असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्र. ९ विषय क्र. ५

दिनांक ०१/०८/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा. रामदास गेणभाऊ बोकड अनुमोदक – मा. राजेंद्र जगताप

संदर्भ : मा. रामदास गेणभाऊ बोकड यांचा दि. ०१/०८/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पारिजात कॉलनी सर्व्हे नं. ८४ व ८५ प्रभाग क्र. ५६ मधुन बीआरटीएस रोड तयार झालेला असुन त्या ठिकाणी नाशिक फाटा उड्डाणपुलापासुन वाकड कडे जाणा-या रस्त्याचा शेवटचा चौक स्वराज हॉटेलच्या अलिकडे आहे. त्या चौकास सुदर्शन चौक असे नामकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्र. १०                                                    विषय क्र. ६

दिनांक ०१/०८/२०१४                                              विभाग – स्थापत्य

सुचक – मा. राजेंद्र जगताप                                       अनुमोदक – मा. शत्रुघ्न काटे

संदर्भ : मा.राजेंद्र जगताप यांचा दि. ०१/०८/२०१४ रोजीचा प्रस्ताव

आरक्षित जागेवर मनपाचे व्यायामशाळा/दवाखाना इमारतीचे शेवटचे मजल्यावर जी पत्राशेड उभारण्यात आलेली आहे ती कोणत्याही कारणासाठी वापरात येत नसुन सदर पत्राशेड नवीन पाण्याच्या टाकीचे ठिकाणी पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेतील आवश्यक असणारी साधनसामग्री/ साहित्य ठेवणेसाठी आवश्यक असल्याने मनपाचे दवाखाना इमारतीवरील पत्राशेड तातडीने स्थलांतरीत करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(आरती चोंधे )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ६८ /२०१४
दिनांक – १३ /०८ /२०१४

सही/-
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती